# इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेचा चिकित्सक अभ्यास

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'मराठी' विषयाच्या पीएच.डी.**
**पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संकल्पित आराखडा**


**-: संशोधक :-**
**सविता दत्तात्रय गच्चे**

**-: मार्गदर्शक :-**
**प्रा.डॉ.अनंत राऊत**
**प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख**
**पीपल्स महाविद्यालय, नांदेड**


**जुलै २०१७**

# इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेचा चिकित्सक अभ्यास

**प्रस्तावना :**

‘कथा’ या वाङ्मय प्रकाराला भारतात फार मोठी परंपरा आहे. प्रथम मौखिक परंपरेने मानवी जीवनात रुजलेल्या या कथेला प्राचीन वारसा आहे. प्राचीन काळापासून माणसाला कथेचे मोठे आकर्षण असल्याचे दिसते. ‘पंचतंत्र’ आणि ‘हितोपदेश’ या दोन उदाहरणावरुनच आपणास कथेचे प्राचीनत्व लक्षात येते. मौखिक परंपरेने आलेली कथा इंग्रज राजवटीच्या मुद्रण काळापासून लिहिली जाऊ लागली.

भाषांतरीत कथा, इसापनीतीच्या कथा, नीतिकथा, दंतकथा, चातुर्य कथा अद्‌भूत कथा, यानंतर हरिभाऊ आपटे यांच्या अर्वाचीन कथेने मराठी कथा नव्या वळणावर नेली. ‘यशवंत’ आणि ‘किर्लोस्कर’ या मासिकाच्या रुपाने भरभराटीस आलेली कथा राजकीय आणि धार्मिक परिवर्तनाबरोबरच अनेक समाज परिवर्तनाच्या चळवळीमुळे कथा अधिक समृध्द होत गेली.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हरिभाऊ आपटे, वि.स.सुखटणकर, श्री म.माटे, ग.ल.ठोकळ, र.वा.दिघे, बी.रघुनाथ, श्री म.माटे, व्यंकटेश माडगूळकर आदि दलितेत्तर कथा लेखकांनी ग्रामीण कथालेखनाबरोबरच दलित जीवनाचेही दर्शन घडविलेले आहे. दलित कथेत अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा.शेंडे, बंधू माधव, बाबूराव बागुल आदी कथाकारांनी दलित कथा समृद्ध केली. नंतरच्या कालखंडात दलित कथेत एक प्रकारचे आवर्त निर्माण होऊन या कथेचा एकात्मिक प्रवास काहीसा खुंटल्यासारखा वाटतो, पण १९९० पूर्वीच्या आणि नंतरच्या कालखंडात कथा लिहिणारे अविनाश डोळस, योगीराज वाघमारे, वामन होवाळ, भीमराव शिरवाळे, योगेंद्र मेश्राम, दया पवार, माधव कोंडविलकर इ. कथाकारांची पिढी अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूलप्रणित कथेचेच अनुकरण करताना दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण कथा लेखकात वामन चोरघडे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रणजित देसाई, उध्दव शेळके यांनी ग्रामीण जीवनानुभवाची वैभव संपन्नता काही

दोषाकडे दुर्लक्ष करुन अनुभव विश्वाची व्यापकता भाषेच्या सुलभीकरणाबरोबरच बोलीभाषेच्या सामर्थ्यानिशी व्यक्त करुन ग्रामीण कथेला एका उंचीवर नेले. याच पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये उराशी बाळगून नवा तरूण लेखक कथाकार ग्रामीण जाणिवांना संवेदनशीलतेने अधोरेखित करताना दिसतो. ग्रामीण जीवनातील राजकारण, रुढी, परंपरा, श्रध्दा-अंध्दाश्रध्दा दु:ख, दैन्य, दारिद्र्य, लोकजीवन आणि लोकसंस्कृती आत्मसात करुन नवे आकलन ग्रामीण कथेच्या माध्यमातून आविष्कृत करु लागला. याच कालखंडात विविध जाती, धर्मातील लेखक नव्याने शिक्षण घेऊन आपले अनुभव साहित्याच्या रुपाने आविष्कृत करु लागले. दलित आणि ग्रामीण साहित्याच्या संदर्भाने प्रा.दत्ता भगत यांचे विवेचन बोलके आहे. ‘चार दशकातील दलित साहित्य, ग्रामीण साहित्य या दोन्ही प्रवाहातील चळवळीचे निरीक्षण केले तर काही विशेष या दोन्ही साहित्यप्रवाहात समान आढळून येतात. उदा. या दोन्ही साहित्य प्रवाहातील लेखक कवींचा सामाजिक स्तर स्थुल मानाने सांगायचे तर ब्राह्मणेतरांचा आहे. दुसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे मराठी साहित्यातील मध्यवर्ती प्रवाहातील लेखनाबद्दल या दोन्ही प्रवाहातील लेखक असमाधान प्रकट करतात.’

आधुनिक मराठी साहित्यातील मराठी दलित व ग्रामीण कथाच नाही तर एकूणच साहित्य प्रवाहातील लेखक म. जोतीराव फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने प्रेरित झाला आणि शिक्षणासाठीप्रवृत्त झाला. शिक्षणामुळे त्यांचे आत्मभान जागे झाले. स्वत:ची जाणीव व्यक्त करण्यासाठी दलित व ग्रामीण समाजातील लेखक पुढे आले. आपल्या जीवनातील अनुभवाचे निवेदन करणे एवढेच मर्यादित प्रयोजन घेऊन ही कथा समोर आली. स्वत:च्या वाङ्मयीन रुपाचा ती फारसा विचार करीत नव्हती, पण हळुहळू या कथेने आपल्या वाङ्मयीन आविष्काराला महत्त्व दिले. दलित कथाकारांनी कथा लिहून दलित समाजाचे दु:ख, अज्ञान त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार, दारिद्र्य यांचे वास्तव आणि सत्य आपल्या कथेतून मांडले.

साठोत्तरी मराठी वाङ्मयात ग्रामीण साहित्याचा आणि दलित साहित्याचा प्रवाह मिसळून मराठी साहित्य अधिक समृद्ध बनले. दलित साहित्याने स्वत:चे वेगळेपण आणि अनुभवाच्या बळावर स्वतंत्र स्थान मराठी साहित्य निर्माण केले. सामाजिक विषमता दलित समाजाच्या दु:खाचे कारण आहे. विषमतेची झळ ही दलित समाजालाच लागली. अस्पृश्य म्हणून पिढ्यान्पिढ्यापासून ज्या वर्गाला हिनवले त्यांच्या स्वत:च्या शब्दातील वेदना वाचकांच्याही अंगावर शहारा आणणाऱ्या होत्या. महात्मा फुले, छ. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळीतून दलितांना जाग आली, आपल्या हक्काची जाणीव झाली, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, अन्यायाविरुद्ध लढा या महामंत्राने दलितांमध्ये जागृतीचे वारे वाहू लागले, तरुण पिढी शिकू लागली, त्यांना अन्यायाची जाणीव होऊ लागली आणि हा अन्याय, अत्याचार, अपमान, पिळवणूक दलित साहित्याला जन्म देऊन गेला.

दलित कवितेप्रमाणेच दलित कथांची संख्या देखील मोठी आहे, परंतु अलिकडच्या काळात दलित कथेचा प्रवाह काही अंशी क्षिण झाला असे वाटू लागले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या नव्या वाङ्मयीन जाणिवा व प्रवृत्ती मराठी साहित्यात येत होत्या त्यामध्ये दलित कथेने स्वत:चे स्थान निर्माण केले. पारंपरिक कथेच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यातून येणारे मध्यमवर्गीय जीवन चित्रणाचे तेच-ते पण पाहता दलित कथेचे वेगळेपण जाणवते. दलित कथा एका व्यक्तीची कथा न राहता ती समाजाची कथा होते. समाजाच्या वास्तव रुपाची ओळख दलित साहित्याने दिली, त्यामुळे या कथांमधून येणारा आशय वाचकांना विचार करावयास लावणारा आहे.

दलित साहित्याची चळवळ मूळ धरीत असतांना दलित कवितेप्रमणे दलित कथा मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली, शोषणाविरोधी व्यापक भूमिकेतून जाणिवाकडे बघून जीवनाचे विविध रंग टिपण्याचा प्रयत्न दलित कथाकारांनी केला. मराठी कथेची विविध रुपे लक्षात घेतांना दलित कथेने रुंदावलेले मराठी कथेचे क्षितीज लक्षात येते. दलित समाजाचे

जीवन दुर्लक्षित, नाकारलेले, धर्मकल्पना, जातीरुढीची जाचक बंधने, यात रुतून बसलेले हे जीवन पांढरपेशीय किंवा मध्यमवर्गीय नाही. स्वत्वाची जाणीव होताच या जीवनाचे पूर्वसंकेत नाकारले. सहानुभूती आणि दयेचा अस्विकार केला. भारतीय समाज व्यवस्थेने लादलेली मानसिक, शारीरिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी छेदण्याचा प्रयत्न सुरु केला. मराठी कथा विश्वाला हे सर्व नवे होते. प्रचंड अनुभवाचे ओझे वाहणारे दलित मन कथा-कवितेतून व्यक्त होतांना मनुष्याची प्रतिष्ठाच शब्दांकित करते असे नाही तर सांस्कृतिक व सामाजिक बंधनाचे अटळ स्वरूप प्रतिपादन करू लागले. त्या बरोबरच खाऊजा संस्कृतीच्या परिणामामुळे दलित व ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या नवसमस्यांनाही कथाकाराने आविष्कृत करुन बदलत्या जीवनाला कवेत घेण्याचा प्रयत्न ते करताना दिसतात.

१९९० नंतरच्या कालखंडात दलित कथाकारांमध्ये अविनाश डोळस, योगीराज वाघमारे, भगवान सवाई, भीमसेन देठे, जी.के.ऐनापूरे, गौतमीपुत्र कांबळे, किशोर घोरपडे, प्रज्ञा दया पवार, आत्माराम गोडबोले, रविंचंद्र हडसनकर, विलास सिंदगीकर, जयराज खुने, एकनाथ सोनवणे, प्रकाश मोगले, अनंत राऊत, बाबुराव गायकवाड, तु.लि.कांबळे, के.व्ही.सरवदे, रविंद्र शिंदे, चंद्रकांत पंडित, आनंद गायकवाड, राम वाघमारे आदी दलित कथाकारांनी दलितांच्या जीवनातील बदलत्या संदर्भाबरोबरच त्या जीवनातील वास्तवाला अधोरेखित केलेले आहे. ग्रामीण कथाकारात आनंद यादव, रा.रं.बोराडे, चंद्रकुमार नलगे, चारुता सागर, दत्ता भोसले, कृष्णा खोत, कृष्णा गायकवाड, सखा कलाल, महादेव मोरे, मधु मंगेश कर्णिक, भास्कर चंदनशिव, सदानंद देशमुख, नागनाथ कोत्तापल्ले, बाबाराव मुसळे, आसाराम लोमटे, जगदीश कदम, रेखा बैजल, ललिता गादगे, मथू सावंत, श्रीराम गुंदेकर, नागनाथ पाटील, प्रभाकर हरकळ, गणेश आवटे, भीमराव वाघचौरे आदी ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण जीवनाविषयीची जाण आणि समाजवास्तवाचे भान ठेवून कथालेखन केलेले आहे.

याआधी कथा लेखन करणारेच बहुतांश कथालेखक १९९० नंतरच्या काळात कथा लेखन करणारे आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, औद्योगिकीकरणामुळे दलित व ग्रामीण जीवनावर झालेल्या परिणामाला अधोरेखित करणारी कथा या दोन्ही साहित्य प्रवाहातील कथाकारांनी लिहून १९९० नंतरची मराठी दलित व ग्रामीण कथा अधिक समृध्द झाली. याबरोबरच या कथेने जीवघेणे राजकारण, भ्रष्टाचारी सहकारी संस्था, जटील ग्रामीण अर्थकारण, तोट्यात गेलेली शेतीची अवस्था, दलितांच्या जीवनातील नव्या जातीय समीकरणाची जटीलता, मूल्यहीन शिक्षण व्यवस्था, त्यामुळे वाढत चाललेली सुशिक्षित बेरोजगारांची संख्या इ. दलित व ग्रामीण समस्यांना या कथाकारांनी कथेतून मांडले. नव्या युगाच्या भानाबरोबरच त्यांनी बदलते संदर्भही नेमकेपणाने चित्रित करुन दलित व ग्रामीण कथा अधिकाधिक समृध्द केली. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने '१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेचा चिकित्सक अभ्यास' करण्यात येणार आहे.

**विषय निवडीची भूमिका :**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याचे अनेक पातळीवरील कुतूहल ही एक नैसर्गिक घटना आहे. वाचनाच्या आणि श्रवणाच्या आवडीतून मराठी साहित्यातील अनेक कलाकृती आणि वाङ्मयीन प्रवाहाच्या अनुषंगाने झालेले लेखन वाचनात आले. अनेक साहित्यिक लेखक विचारवंत, समीक्षकांच्या अभ्यासपूर्ण विवेचनाच्या आकलनातून मराठी साहित्यातील अनेक प्रवाहांपैकी दलित व ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिक परिणामकारक वाटून दलित व ग्रामीण कथा अधिक जवळची वाटायला लागली. वाङ्मयीन चळवळी, राजकीय स्थित्यंतरे, सामाजिक परिवर्तने यांच्या अनुषंगाने कथा बदलत गेली. १९९० नंतर मात्र जागतिकीकरणामुळे साधे सोपे सरळ वाटणारे दलित व ग्रामीण जीवन अधिक गुंतागुंतीचे बनत गेले. या गुंतागुंतीच्या जीवनाचा मी एक घटक असल्यामुळे या व्यामिश्र जीवनाचा शोध घेण्याची जिज्ञासा

किंवा कुतूहल निर्माण झाले, म्हणून संशोधनासाठी मी '१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेचा चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडला आहे.

प्रस्तुत कालखंडात ग्रामीण शेतकरी आणि दलितांचे जीवन भ्रष्टाचारामुळे अन् विविध समस्यामुळे गर्तेत अडकल्याचे दिसते. स्वार्थांधतेमुळे हरवत चाललेली माणुसकीही अनेक कथाकारांच्या कथेचा विषय होऊन कथा अवतरत होती. दलित व ग्रामीण जीवनातील समस्यांना निर्भिडपणे कथेतून आविष्कृत करून शोषणमुक्त मानवतावादी नवसमाजाची स्वप्न पाहणारी कथा लेखक मंडळीची दलितांच्या जीवनाशी व ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ घट्ट दिसते. अशा कथा लेखकांच्या कथेचा अभ्यास करून त्यातील मानवी मूल्ये, वाङ्मयीन मूल्ये शोधण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

'इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेचा चिकित्सक अभ्यास' प्रस्तुत विषय संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. २० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या आरंभापासून भारतीय समाजजीवनात स्थित्यंतरे घडून आली. म.गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या विचाराच्या प्रभावाने सामाजिक जीवनात अमुलाग्र बदल घडून साहित्यावरही त्याचा खोल परिणाम झाला. या विचारातून १९६० नंतरच्या साहित्य प्रवाहांचा जन्म झाला. वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतून तळागाळातील दलितांच्या जीवनाबरोबरच ग्रामीण जीवनाचेही वास्तव साहित्यातून उजागर होऊ लागले. दलित, ग्रामीण साहित्यिक जीवनाचा आत्मशोध घेऊ लागले. दलितकथा, ग्रामीण कथा, आत्मशोध घेणारी कथा ठरली गेली. जातीव्यवस्थेविरोधी ठरलेले बंड १९९० नंतरच्या कथेत ते राजकारण, शिक्षण, आरक्षण, नोकरी आणि आत्मसन्मानासाठीचे बंड म्हणून वेगळे ठरते. तर ग्रामीण जीवनात शेती-पाणी, लोडशेडींग, सुशिक्षित बेकारी, स्त्री-शोषण, बदलते वैवाहिक जीवन, राजकारण, समाजकारण, जातीचे भांडवलीकरण व

सांस्कृतिकरण खाऊजाचे धोरण अशा बदलत्या समस्यांचा परिणाम दोन्हीही साहित्य प्रवाहावर झालेला दिसतो. प्रस्तुत साहित्य प्रवाहातील कथा वाङ्मय प्रकारावर संशोधन झाले पाहिजे. नव्याने निर्माण झालेल्या समस्यांवर काही उपाय सुचवता येतील. साहित्यातून अशा समस्या, प्रश्न कालात्मकतेने कसे मांडले. याच्या शोधासाठी प्रस्तुत शोधप्रबंध दिशादर्शक ठरु शकेल.

**संशोधन पद्धती :**

कोणत्याही संशोधकाला संशोधनाची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी आणि संशोधन शास्त्रशुध्द होण्यासाठी संशोधन पध्दतीची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधनात संशोधकास निरीक्षणात्मक, आस्वादात्मक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक या पध्दतीचा अवलंब करावयाचा असून 'इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

'इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेचा चिकित्सक अभ्यास' या संशोधनात्मक शोधप्रबंधानुषंगाने संशोधकाने काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत शोध आराखड्याची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) दलित व ग्रामीण कथेतून चित्रित झालेल्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनाचा चिकित्सकपणे शोध घेणे.

२) दलित व ग्रामीण कथांमधून आविष्कृत झालेल्या स्त्री जीवनाचा शोध घेणे.

३) भारतीयांनी स्वीकारलेले खुले आर्थिक धोरण, खाऊजा संस्कृतीचा परिणाम, मराठी दलित, ग्रामीण कथेवर एकत्रित जाणवतो का ? याचाही शोध घेणे.

४) दलित कथेतून उजागर झालेल्या व्यथा, वेदनांबरोबरच ग्रामीण कथेतून शेतकरी-शेतमजुरांचे शोषण त्यांच्या समस्यांचा शोध घेणे.

५) दलित आणि ग्रामीण कथेतून साकारलेल्या परिवर्तनशील जीवनाचा शोध घेणे.

६) दलित, ग्रामीण कथाकारांचा दृष्टिकोन समृध्द झाला का ? म्हणून त्यांच्या जीवनानुभवाच्या आशयाचा शोध घेणे.

७) दलित व ग्रामीण कथेतून प्रकट होणाऱ्या जीवनानुभवांची तौलनिक पद्धतीने चिकित्स करणे.

८) दलित व ग्रामीण कथेतील व्यक्तिचित्रणाचे स्वरुप व भाषाशैलीचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहितके :**

'इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेचा चिकित्सक अभ्यास' या विषयानुषंगाने एक संशोधक अभ्यासक म्हणून संशोधन प्रबंधासाठी खालील गृहितके मांडून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

१) १९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेतून सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील अस्वस्थता अधोरेखित होते.

२) दलित व ग्रामीण कथेतून स्त्री जीवनातील व्यथा वेदना प्रगट होतात.

३) खाऊजा संस्कृतीमुळे मानवी भ्रष्टाचार या स्वकेंद्रीत वृत्तीचे समकालीन समाजवास्तव दलित ग्रामीण कथेतून उमटलेले आहे.

४) दलित आणि ग्रामीण कथेतील जीवनानुभवातील आविष्कारसाम्य प्रत्ययास येते.

५) दलित कथेच्या मुळाशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आहे, तर ग्रामीण कथा वाङ्मयावर म.फुले, म. गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव जाणवतो.

**संशोधनाची मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन विषयातील आशय मूल्यांचा अविभाज्य घटक असल्यामुळे संशोधनात सुलभता नेमकेपणा आणि अचूकता येण्यासाठी विषयाच्या कक्षा किंवा मर्यादा घालून घ्याव्या लागतात. त्यानुषंगाने प्रस्तुत संशोधकाने मराठी दलित व ग्रामीण

कथेचा अभ्यास करताना इ.स. १९९० ते २०१५ या कालखंडाची मर्यादा घालून घेतलेली आहे.

**संशोधनाची प्रकरण रुपरेषा**

'इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेचा चिकित्सक अभ्यास' या संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकरणनिहाय रुपरेषा खालीलप्रमाणे :

**प्रकरण १ ले : मराठी दलित व ग्रामीण निवडक कथा उदय व विकास**

प्रस्तुत प्रकरणात स्थुल रुपाने दलित व ग्रामीण निवडक कथेचा उदय व विकासाचा टप्पा सांगून इ.स.१९६० नंतरच्या कथा प्रवाहाचा स्थूल आढावा घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रकरण २ रे : इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेतील जीवनानुभवाचे स्वरूप**

प्रस्तुत प्रकरणात १९९० नंतरच्या दोन्हीही प्रवाहातील निवडक कथाकारांच्या कथांमधून आलेल्या विविध पातळीवरच्या जीवनानुभवाचा अभ्यास मांडण्यात येईल.

**प्रकरण ३ रे : इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेतील व्यक्तिचित्रण**

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथाकारांच्या कथांमधून चित्रित झालेल्या व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रकरण ४ थे : इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेची भाषाशैली**

सदरील प्रकरणामध्ये दलित व ग्रामीण निवडक कथाकारांच्या कथा वाङ्मयातून आलेल्या भाषाशैलीचा अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण ५ वे इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेतील जीवन संघर्षाचे स्वरूप**

दलित व ग्रामीण या दोन्ही प्रवाहातील निवड कथाकारांच्या कथांच्या अभ्यासातून दलितांच्या जीवनातील बदलत्या जीवन संघर्षाला अधोरेखित करणारी कथा

व बदलत्या ग्रामीण जीवनातील कथाकारांनी मांडलेले जीवन संघर्षाचे स्वरुप शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रकरण ६ वे : इ.स.१९९० नंतरच्या दलित व ग्रामीण निवडक कथेतील खाऊजा संस्कृतीचे स्वरुप**

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९९० नंतर भारतीय समाज व्यवस्थेवर जसा या खाऊजा संस्कृतीचा परिणाम झाला तद्वतच दलित व ग्रामीण कथा वाङ्मयावरही कशा पध्दतीने प्रभाव होऊन प्रस्तुत कालखंडातील कथेचे स्वरुप शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रकरण ७ वे :** १९९० नंतरच्या दलित व ग्रामीण कथेतील जीवनानुभव व अविष्कार पद्धतीची तौलनिक चिकित्सा.

**प्रकरण ८ वे : उपसंहार व निष्कर्ष**

सदरील प्रकरणात एकूण प्रकरणांचा सारांशरुपी उपसंहार मांडून हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी केली जाणार आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१) इंगोले कृष्णा (संपा.), ग्रामीण साहित्य आणि वास्तव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०११.

२) कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती २००८.

३) प्राचार्य डॉ.म.सु.पगारे, ग्रामीण-दलित साहित्याचा अनुबंध, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

४) जोशी सुधा (संपा.), मराठी कथा : विसावे शतक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००४.

५) नलगे चंद्रकुमार (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६.

६) पुटवाड माधव, कृषी साधनांचा कोश, बोके प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती २००८.

७) फुलावळे सुभाष, मराठी कथा : परंपरा आणि स्वरुपविशेष, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१०.

८) मालसे सं.ग., शोधनिबंधाची लेखनपद्धती, लोकवाङ्मयगृह, मुंबई, आवृत्ती चौथी २००८.

९) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती २००५.

१०) मुलाटे वासुदेव (संपा.), मराठवाड्याची कथा, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९४.

११) लुलेकर प्रल्हाद (संपा.), मराठवाड्यातील साहित्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००८.

१२) शिंदे संजय (संपा.), नागनाथ कोत्तापल्ले : व्यक्ती आणि वाङ्मय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००८.

१३) संपादन समिती, साहित्याचा अभ्यास : डॉ.र.बा. मंचरकर सद्भाव ग्रंथ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३.

१४) सावंत मथू, कथाकार भास्कर चंदनशिव, संगत प्रकाशन, नांदेड द्वितीय आवृत्ती २००६.

१५) सुरवडे मनोहर, १९८० नंतरची ग्रामीण कथा, बळीवंश प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती २०१०.

१६) हातकणंगलेकर म.द., मराठी कथा : रुप आणि स्वरुप, श्री विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००८.

संशोधन मार्गदर्शक | संशोधक

**प्रा.डॉ.अनंत राऊत**
प्रपाठक व मराठी विभागप्रमुख
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

**सविता दत्तात्रय गच्चे**